# विश्वबंधुत्वातून मानवी हक्कांची जपणूक करण्याची गरज

## न्या. एस.आर.बन्नूरमठ यांचे आवाहन

**प्रतिनिधी, सोलापूर**

**जागतिकीकरणाच्या आजच्या** कालखंडात अधिकाधिक संकुचित व स्वकेंद्रित विचार केला जात आहे. मानवतेवरील आपला विश्वास दृढ करून, विश्वबंधुत्वाचा विचार जोपासत इतरांच्याही मानवी हक्कांची जपणूक आपण केली पाहिजे, अशी अपेक्षा राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष, निवृत्त न्या: एस. आर. बन्नूरमठ यांनी व्यक्त केली.

सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे विभागाच्यावतीने विद्यापीठात 'मानवी हक्क आणि मानवीय समाज' या विषयावर आयोजिलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचा प्रारंभ करताना न्या. बन्नूरमठ बोलत होते. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन सत्राप्रसंगी व्यासपीठावर राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम. ए. सईद व भगवंतराव मोरे यांच्यासह विद्यापीठाचे कुलसचिव देवेंद्रनाथ मिश्रा, सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक प्रा. ई. एन. अशोककुमार, डॉ. माया पाटील, डॉ. प्रकाश व्हनकडे आदी उपस्थित होते.

न्या. बन्नूरमठ म्हणाले,की राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना झाल्यापासून अनेकांना न्याय मिळवून देता आला आहे. सार्वजनिक प्राधिकरणात कार्य करणाऱ्या व्यक्ती मानवी हक्क उल्लंघनाच्या तक्रारीबाबत योग्य कार्यवाही करीत नसतील तर अशा व्यक्ती व प्राधिकरणावर कारवाई करून सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करतो. आयोगाकडे आलेली प्रकरणे निकाली काढताना आपण अर्जदारांकडून कोणतेही शुल्क आकारत नाही. मानवी हक्कांचे उल्लंघन कोठे होत असेल तर कोणीही यासंदर्भात आयोगाकडे माहिती देऊ शकतो. गरज पडल्यास आयोग स्वतः काही प्रकरणात कारवाई करू शकतो.

कुलगुरू डॉ. मालदार यांनी अध्यक्षीय भाषणात,''आपण स्वतःच्या हक्कांबाबत जेवढे जागृत असतो, तेवढाच इतरांच्या मानवी हक्कांचाही विचार करून त्याप्रमाणे वागणुकीत बदल केला पाहिजे,'' अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी बोलताना राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य सईद म्हणाले, शिक्षण हे मानवी हक्कांची जाणीव करून देणारे महत्त्वाचे साधन आहे. मानवी हक्कांविषयी अलीकडे चांगले कार्य झाले आहे. मानवी हक्कांबाबत आणखी महत्त्वपूर्ण कार्य होण्यासाठी नागरिकांनी खुल्या मनाने विचार करण्याची तसेच मानवी हक्कांची जपणूक करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. आयोगाचे दुसरे सदस्य, निवृत्त आयपीएस अधिकारी भगवंतराव मोरे यांनीही मानवी हक्कांबाबत मांडणी केली.

दुसऱ्या सत्रात म्हैसूर विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे डॉ. मुझफ्फर असादी यांनी मार्गदर्शन केले. उद्या शुक्रवारी कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी हैदराबादच्या केंद्रीय विद्यापीठातील प्रा. शिवा प्रसाद व प्रा. सुधीर जेकब जॉर्ज, गोवा विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे डॉ. बद्रुद्दीन व राष्ट्रीय भटके विमुक्त आयोगाचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण रेणके हे सहभागी होऊन विचारांची मांडणी करणार आहेत.



**सोलापूर विद्यापीठात मानवी हक्कांबाबत आयोजिलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचा शुभारंभ करताना आयोगाचे अध्यक्ष न्या. एस. आर. बन्नूरमठ. सोबत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार, मानवी हक्क आयोगाचे सदस्य एम.ए. सईद, भगवंतराव मोरे, डॉ. माया पाटील व अन्य.**